पुण्य नगरी

# विद्यार्थ्यांनी १० हजार नागरिकांना केले सायबर साक्षर




**नाशिक :** मविप्रच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभाग व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत वीस विद्यार्थ्यांनी गेल्या दोन महिन्यात १० हजारांहून अधिक नागरिकांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक केले. या कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

संगणकशास्त्र विभागातील २० विद्यार्थ्यांनी गेल्या दोन महिन्यांत शाळा, महाविद्यालये, बस स्थानके, गोदाकाठ परिसर, पोलीस ठाणे, ज्येष्ठ नागरिक संघ, उद्याने, मंदिरे आदी ठिकाणी सायबर सुरक्षेबाबत जागृती केली.

क्लब ऑफिसर्स तेजल खराडे, साक्षी जाधव, श्रद्धा मोरे आणि सुवर्णा वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य व संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल पाटील यांनी मार्गदर्शन केले. समन्वयक प्रा. सुनिता देवरे, प्रा. ज्ञानेश्वर आहेर, प्रा. सीमा पाटील, प्रा. रोहिणी कापसे, प्रा. किर्ती मोरे, प्रा.भारती महाले, प्रा. केतकी भुसारे, प्रा. विद्या पानसरे, प्रा. नीलिमा मोरे, प्रा. कांचन गडाख व संगणक शास्त्रातील इतर शिक्षक उपस्थित होते. यावेळी कावेरी गाडेकर, साक्षी खैरनार, पुंडलिक पवार, गौरव चौधरी, साक्षी गवारे, प्रवीण दहातोंडे, श्रद्धा मोरे, ऋतिका राजपूत, तेजल खराडे, संस्कृती मुसळे, साक्षी आहेर, जयश्री पाटील या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

Nashik Edition
Jan 17, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com